# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** अम्बरनाथ

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0475 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**05/09/2023 04:51

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 04/09/2023
**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 04/09/2023
**Time From (वेळेपासून):** 11:33 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:33 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 04/09/2023 **Time (वेळ):** 11:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 013
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/09/2023 04:51 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** राधाकष्ण मंदिरसमोर,कल्याण बदलापुर रोड,अंबरनाथ प

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. हरदिप कमलजित सिंग

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | इतर | 463319825995 |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 202,सरस्वती मंगल निवास, , उल्हासनगर-1,अम्बरनाथ,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 202,सरस्वती मंगल निवास, , उल्हासनगर-1,अम्बरनाथ,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7888202200

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. हेमंत गोविंद तिडके | | | 1. ए विंग, फ्लट नं 201, दिपीका अपार्टमेनट, उषा नगर,, मुरबाड रोड, कल्याण पश्चिम , अम्बरनाथ,ठाणे शहर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | श्री. पांडूरंग देवदास सुर्यवंशी | | | 1. त्रिवेणी अपार्टमेन्ट, फ्लट नं, 401, मोतीराम पार्क, , अंबरनाथ पूर्व,अम्बरनाथ,ठाणे |



CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | शहर,महाराष्ट्र,भारत |
| 3 | श्री. सागर जनार्दन ठाकूर | | | 1. फ्लट नं 303, मुक्ता हाईटस,, शाश्वत पार्क, बदलापूर पश्चिम, अम्बरनाथ,ठाणे शहर,महाराष्ट्र, भारत |
| 4 | श्री. नितीन शाम साळवे | | | 1. अशोक सम्राट नगर, गल्ली नं 2, वासु किराणा,स्टोअर्सच्या बाजुला, उल्हासनगर,अम्बरनाथ, ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक- 05/09/2023

श्री. हरदिप कमलजित सिंग, वय 33 वर्षे,रा. बॅरेक नं. 256, सरस्वती मंगल निवास, फ्लॅट नं. 202, उल्हासनगर-1. मोबाईल नं. 7888202200 असा असून समक्ष फिर्याद लिहून देतो की,
वरील नमुद पत्त्यावर मी माझे कुटूंबासह रहावयास आहे. वरील सदर पत्त्यावरील फ्लॅट हा श्री. नामदेव ओचानी यांचे मालकीचा असून तो मी त्यांचेकडून भाडेतत्वावर राहण्यासाठी घेतलेला आहे. तसे माझेत व फ्लॅट मालक श्री. ओचानी यांचेत अँग्रिमेन्ट झालेले आहे. अँग्रिमेन्ट प्रमाणे सदर फ्लॅटचे मासिक लाईट बील हे मीच भरणा करत असून त्याचा ग्राहक क्र. 021510713246 असा अहे. परंतु सदर वीज मीटरचे बील वारंवार भरणा करुनही सदर फ्लॅटचे लाईट बील हे जास्त येत असल्यामुळे त्याबाबत मी फ्लॅट मालक यांची मुलगी दिपा ओचानी हिच्याशी बोललो. त्याप्रमाणे फ्लॅट मालक श्री. नामदेव ओचानी यांचे वतीने त्यांची मुलगी दिपा ओचानी हिने वीज मीटर बदली होवून मिळणेबाबत दि. 01/08/2023 रोजी उप मुख्य अभियंता, उल्हासनगर यांना अर्ज दिला होता. त्याप्रमाणे दि. 14/08/2023 रोजी फ्लाईगस्कॉड युनिट, कल्याण सर्कल 1 चे सहाय्यक अभियंता, श्री. तिडके मीटर तपासणीकरीता आले होते. त्यावेळी त्यांनी मीटर तपासणी करुन पंचनामा केला व सदर पंचनाम्यावर व स्पॉट इन्सपेक्षन रिपोर्टवर मला सहया करण्यास सांगितल्या. परंतु सदर ठिकाणी मी भाडयाने राहत असल्यामुळे मी त्यांना सही करण्यास नकार देवून पंचनाम्यावर व स्पॉट इन्सपेक्षन रिपोर्टवर फ्लॅट मालकांची सही घेण्यास सांगितले. परंतु तरीही त्यांनी माझी स्पॉट इन्सपेक्षन रिपोर्टवर सही घेतली व सदरचा जुना वीज मीटर त्यांनी ताब्यात घेउन त्याठिकाणी नवीन वीज मीटर बसवून दिलेला आहे.
त्यानंतर मी दि. 15/08/2023 रोजी सदरबाबत फ्लॅटचे मालक यांची मुलगी नामे दिपा नामदेव ओचानी यांना सांगितले असता त्यांनी मला मी सदर ठिकाणी भाडयाने राहत असल्याने मीटर बाबतचा मला पाठपुरावा करण्यास सांगून त्याबाबत मला अधिकारपत्र दिले.
त्यानंतर दि. 28/08/2023 रोजी सायंकाळी मला माझा मोबाईल क्र. 7888202200 वर एका प्रकाश नावाच्या इसमाचा, मोबाईल क्र. 8879620477 वरुन फोन आला. सदरचा फोन मी उचलला असता, ते



CamScanner

व्हिजिलन्स ऑफिस कल्याण, येथून बोलत असल्याचे सांगून मला एमएसईडीसीएल कार्यालय कल्याण येथे त्याने तात्काळ येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी लगेच एमएसईडीसीएल कार्यालय कल्याण येथे जाऊन सदर प्रकाश नावाच्या इसमाला भेटलो असता, ते मला फ्लाईंगस्कॉड युनिट, कल्याण सर्कल 1 चे सहाय्यक अभियंता, श्री. तिडके व बुंधे यांचेकडे घेऊन गेले. सदर ठिकाणी मला त्यांनी जुना वीज मीटर दाखवून सदर मीटरमध्ये मी छेडछाड केली आहे असे मला सांगण्यात आले व तसा पंचनामा करुन सदर पंचनाम्यावर माझी सही घेवून मला घरी जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे पंचनाम्यावर सही करुन मी घरी निघून आलो.

त्यानंतर दि. 29/08/2023 रोजी मी माझा मित्र गुडडू याचे सोबत बाहेर असताना म.रा.वि.वि.कं.मार्या. उल्हासनगर उपविभाग-2 कार्यालयातील आमचे हद्दीतील लाईनमन श्री. सुर्यवंशी यांनी मला त्यांचे मोबाईलवरुन फोन केला. परंतु माझ्या मोबाईलला व्यवस्थित आवाज येत नसल्यामुळे मी त्यांचा फोन कट करुन त्यांना, माझा मित्र गुड्डू याचा मोबाईल क्र. 8788998445 व 9764151919 वरुन कॉल केला तेव्हा त्यांनीही मला मीटरमध्ये मी छेडछाड केली म्हणून मला तीन वर्षाचे दंडासह तीन लाख रुपये लाईट बील भरावे लागेल, अन्यथा माझ्यावर वीज मीटरमध्ये मी छेडछाड केली म्हणून गुन्हा दाखल होईल असे मला सांगितले. त्यावेळी मी त्यांना, असे काही करु नका, जुन्या वीज मीटरमध्ये मी काहीही छेडछाड केलेले नाही. परंतु त्यासाठी मला आता काय करावे लागेल? अशी लाईनमन श्री. सुर्यवंशी यांना मी विचारणा केली. तेव्हा लाईनमन श्री. सुर्यवंशी यांनी मला श्री. तिडके साहेब हे एमएसईबी कार्यालय अंबरनाथ येथील श्री. सागर ठाकूर यांचे ओळखीचे असून त्यांना विचारणा करुन सांगतो असे मला सांगितले.

त्यानंतर काही वेळाने श्री. सुर्यवंशी याने मला पुन्हा संपर्क करुन श्री. सागर ठाकूर यांनी श्री. तिडके साहेबांशी बोलणी करुन ''सदरचे लाईट बील मला कमी करुन हवे असल्यास श्री. तिडके साहेबांना मला 75,000/- द्यावे लागतील'' असे श्री. सागर ठाकूर यांनी सांगितले असल्याचे मला सांगितले. त्यावेळी आमच्या हद्दतील लाईनमन श्री. सुर्यवंशी हे मी राहत असलेल्या फ्लॅटचे जुन्या मीटरचे लाईट बील कमी करुन देण्याकरीता त्यांचे भरारी पथकाचे अधिकारी श्री. तिडके, यांच्यासाठी माझ्याकडे 75,000/- रु. लाचेच्या रक्कमेची मागणी करत असल्याचे माझ्या लक्षात आले.

परंतु मला म.रा.वि.वि.कं.मार्या. उल्हासनगर उपविभाग-2 कार्यालयातील, लाईनमन श्री. सुर्यवंशी श्री. सागर ठाकूर व फ्लाईंगस्कॉड युनिट, कल्याण सर्कल 1 चे सहाय्यक अभियंता, श्री. तिडके, यांना लाचेची रक्कम दयायची माझी इच्छा नसल्याने मी त्यांचे विरूध्द कारवाई होणेसाठी दि. 31/08/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालय येथे लेखी तक्रार दिली.

दिनांक 31/08/2023 रोजी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने म.रा.वि.वि.कं.मार्या. उल्हासनगर उपविभाग-2 कार्यालयातील, लाईनमन श्री. सुर्यवंशी, श्री. सागर ठाकूर व फ्लाईंगस्कॉड युनिट, कल्याण सर्कल 1 चे सहाय्यक अभियंता, श्री. तिडके, हे माझ्याकडे खरोखरच पैशाची मागणी करतात अगर कसे? याची खात्री करण्याकरीता पोनि/क्षिरसागर यांनी दि. 31/08/2023 रोजी दोन शासकीय पंच पाचारण करुन त्यांना माझ्या तक्रारीची थोडक्यात हकीगत सांगून पडताळणी कारवाई करण्याचा निर्णय घेतला.

त्याप्रमाणे दि. 31/08/2023 रोजी पडताळणी कारवाई अनुषंगाने आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन पडताळणी कारवाई करण्यात आली. पडताळणी कारवाईवेळी मला डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर लावून शासकिय पंच श्री. पोटकुळे यांचे सोबत प्रथम लोसकेवक श्री. सुर्यवंशी यांना भेटण्यासाठी पाठविण्यात आले. त्याप्रमाणे मी म.रा. वि.वि.कं.मार्या. उल्हासनगर उपविभाग-2 कार्यालयातील, लाईनमन श्री. सुर्यवंशी यांना फोन करुन साईबाबा, उल्हासनगर-3 येथे भेटण्यासाठी माझे ताब्यातील फोर व्हिलर गाडीने पंच क्र. 1 यांचेसह गेलो. तेथे पोहच्यानंतर लोकसेवक श्री. सुर्यवंशी हे गाडीत बसण्यासाठी आले त्यावेळी त्यांना संशय येऊ नये म्हणून माझे सोबत असलेले पंच श्री. पोटकुळे यांना मी गाडीतून उतरुन बाहेर थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे पंच श्री. पोटकुळे हे गाडीतून उतरुन आम्ही दिसेल अशा ठिकाणी बाहेर थांबून राहिले. सदरवेळी श्री. सुर्यवंशी यांना मी भेटून त्याच्याशी लाईट बिलासंदर्भात बोलणी करत असताना श्री. सुर्यवंशी याने ''तो अभी तक जो आपको करना है करो'' असे मला सांगितले. त्यावेळी मी त्यांना ''थोडा कुछ तो कम करा के दो'' असे सांगून लाचेची रक्कम कमी करण्यास विनंती केली असता श्री. सुर्यवंशी याने ''फायनल बता दिया आपको जो है'' असे मला सांगितले. त्यावेळी मी त्यांना ''नितीन सेवेंटी फाईव्ह बोल रहा है'' असे सांगितले असता श्री. सुर्यवंशी यांनी ''सेवेंटी फाईव्ह बोला था ना आपको?'' असे सांगून ''उसमे से एक रुपया भी नही मेरे को मंगताय, सत्तर से पचहत्तर वो मेरे को बोला था जिधर वो माना'' असे सांगून माझ्याकडे माझे प्रलंबित कामाकरीता भरारी पथकातील तिडके यांचेकरीता 75,000/- रु ची मागणी केली. त्यानंतर मी लोकसेवक श्री. सुर्यवंशी यांना ''साहब से बात होएगा?'' म्हणजेच सहाय्यक अभियंता श्री. तिडके यांच्याशी बोलणे होईल का असे विचारले असता श्री. सुर्यवंशी यांनी मला साहेब बोलणार नाहीत असे



CS CamScanner

सांगितले. म्हणून मी लोकसेवक श्री. सुर्यवंशी यांना पुन्हा ''लास्ट कितना करोगे? अभी बताओ..एकदम लास्ट '' असे विचारले असता लोकसेवक श्री. सुर्यवंशी यांनी ''सत्तर, पचहत्तर दोनों मे से एक होगा......उसको मंगताय तो आप पचहत्तर देदो, बाचाया तो पाँच बचेगा आपका, सत्तर मे पटाता हू'' असे सांगून लोकसेवक श्री. सुर्यवंशी यांनी फ्लाईंगस्कॉड युनिट, कल्याण सर्कल 1 चे सहाय्यक अभियंता, श्री. तिडके यांच्यासाठी माझेकडे 75,000/- रु. लाचेच्या रक्कमेची मागणी केली.

त्यानंतर मी लोकसेवक श्री. सुर्यवंशी यांना पुन्हा लाचेची रक्कम कमी करुन देण्याबाबत विनंती केली असता, लोकसेवक श्री. सुर्यवंशी यांनी त्यांचे मोबाईलवरुन म.रा.वि.वि.कं.मर्या. उपविभाग कार्यालय अंबरनाथ येथील लोकसेवक श्री. सागर ठाकूर याचे मोबाईलवर फोन लावून ''बंधु.....बोला ना.....हा...हू.....एक मिनिट बोलून घ्या ना त्यांच्याशी, किती सत्तर पर्यंत होतील का त्यांचे?'' असे बोलून फोन माझेकडे दिला. सदरेवळी मी लोकसेवक श्री. सागर ठाकूर याचेशी बोलत असताना लाकसेवक ठाकूर याने मला ''बोले, लेके रख, सुबह आजा इधर लेके,'' म्हणजेच लोकसेवक श्री. तिडके यांनी सदर लाचेची रक्कम मला त्यांचेकडे दयायला सांगितली आहे असे मला त्यांनी सांगितले. त्यानंतर मी त्यांना ''लेकिन साहब से तो एक बार बोलो की इनको दे रहा हू मै.....भले आपको बाहर जा के दे दुंगा मै'' असे लोकसेवक श्री. ठाकूर यास सांगितले असता त्यांनी त्यास नकार देवून मला लोकसेवक श्री. सुर्यवंशी यांना घेऊन अंबरनाथ, मटका चौक येथे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे लोकसेवक श्री. सागर ठाकूर यांना भेटण्यासाठी मी व पंच श्री. पोटकुळे असे माझे ताब्यातील फोर व्हिलर गाडीने व लोकसेवक श्री. सुर्यवंशी हे त्यांचे दुचाकी गाडीने अंबरनाथ, मटका चौक येथे आलो.

लोकसेवक श्री. सुर्यवंशी यांचेसह मी व पंच श्री. पोटकुळे असे अंबरनाथ, मटका चौकातील प्रेमाच्या चहाच्या टपरीवर लोकसेवक श्री. सागर ठाकूर यास भेटलो सदरवेळी मी लोकसेवक श्री. सागर ठाकूर यास लोकसेवक श्री. तिडके यांच्याशी बोलणे करुन देण्यास सांगितले. लोकसेवक श्री. ठाकूर गाडीतून उतरुन बाहेर जात असताना मी त्यांना ''बैठो ना.....बैठो ना'' असे सांगितले असता, लोकसेवक श्री. ठाकूर यांनी मला ''अरे पेहले उनसे बात तो करने दो'' असे सांगून त्यांनी त्यांचे मोबाईलवरुन लोकसेवक श्री. तिडके, यांना फोन लावला. त्यावेळी लोकसेवक श्री. ठाकूर यास मी ''खाली अमाउंट का मेरे सामने करना'' असे सांगितले.

लोकसेवक श्री. सागर ठाकूर याचे लोकसेवक श्री. तिडके यांच्याशी फोनवर बोलणे झाल्यानंतर ते पुन्हा गाडीत येऊन बसले व त्यांनी मला त्यांचा फोन देवून लोकसेवक तिडके यांच्याशी फोनवर बोलण्यास सांगितले. त्यावेळी मी मोबाईलचा स्पिकर ऑन करुन लोकसेवक श्री. तिडके यांना ''हॅलो..तिडके सर, हरदिप बोल रहा हू, सर कुछ तो कम करा दो ना'' असे सांगून 75,000/- रु लाचेच्या रक्कमेत तडजोड करण्यास सांगितले. त्यावेळी लोकसेवक श्री तिडके यांनी ''अरे कम ही बोला है, कितना है तुम्हारा?......फिप्टी टू पॉईंट नाईटी परसेंट स्लो के हिसाब से छे लाख के उपर...छे लाख आताय.... अभी वो......चल अभी बोला वो इतना नही भर सकताय, ये नही भर सकताय, अभी सबको....मतलब जो टेस्टींगवाले है, जितने लोग थे उन सबको बाटना पडेगा ना.....तभी वो रिपोर्ट कम करके देंगे'' असे सांगितले. त्यावेळी लोकसेवक श्री. तिडके यांना मी पुन्हा ''एक लास्ट.......लास्ट अमाउंट बताओ ना सर'' असे म्हणून त्यांना विनंती केली असता लोकसेवक श्री. तिडके यांनी ''नही बराबर उन लोगो ने बोला है, लास्ट लास्ट क्या मै बोलू'' असे मला सांगून लोकसेवक श्री. सुर्यवंशी व श्री. ठाकूर यांनी मला सांगितलेली 75,000/- रु लाचेची रक्कम योग्य असल्याचे सांगितले. लोकसेवक श्री. तिडके यांना विनंती करुनही ते लाचेच्या रक्कमेबाबत स्पष्ट बोलत नसल्यामुळे मी पुन्हा त्यांना ''अच्छा....फिर भी लास्ट, एक, एक थोडा मेरे लिए तो....कुछ तो कम करो'' असे बोलून लाचेच्या रक्कमेत ताडजोड करण्यास पुन्हा विनंती केली असता, लोकसेवक श्री तिडके यांनी हसून ''पाच कम देदो......हू हू...पाच कम देदो'' असे सांगितले. त्यावेळी मी पुन्हा त्यांना ''कितना दू? कितना दू?'' असे पुन्हा विचारले असता, लोकसेवक श्री. तिडके यांनी सेवंटी देदो ना'' असे सांगून लोकसेवक श्री. तिडके यांनी तडजोडीअंती 70,000/- रु लाचेच्या रक्कमेची मागणी केली. त्यानंतर लोकसेवक श्री. सागर ठाकूर यांनी लोकसेवक श्री. तिडके यांच्याशी फोनवर बोलणे झाल्यानंतर ते पुन्हा गाडीत येऊन बसले व त्यांनी मला त्यांचा फोन देवून लोकसेवक तिडके यांच्याशी फोनवर बोलण्यास सांगितले. त्यावेळी मी मोबाईलचा स्पिकर ऑन करुन लोकसेवक श्री. तिडके यांना ''हॅलो..तिडके सर, हरदिप बोल रहा हु, सर कुछ तो कम करा दो ना'' असे सांगून 75,000/- रु लाचेच्या रक्कमेत तडजोड करण्यास सांगितले. त्यावेळी लोकसेवक श्री तिडके यांनी ''अरे कम ही बोला है, कितना है तुम्हारा?......फिप्टी टू पॉईंट नाईटी परसेंट स्लो के हिसाब से छे लाख के उपर...छे लाख आताय.... अभी वो......चल अभी बोला वो इतना नही भर सकताय, ये नही भर सकताय, अभी सबको....मतलब जो टेस्टींगवाले है, जितने लोग थे उन सबको बाटना पडेगा ना.....तभी वो रिपोर्ट कम करके देंगे'' असे सांगितले. त्यावेळी लोकसेवक श्री. तिडके यांना मी पुन्हा ''एक लास्ट.......लास्ट अमाउंट बताओ ना सर'' असे म्हणून त्यांना विनंती केली असता लोकसेवक श्री. तिडके यांनी ''नही बराबर उन लोगो ने बोला है, लास्ट लास्ट क्या मै बोलू''



CamScanner